दैनिक मराठवाडा पत्र



# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 1769 रुग्णांना सुमारे 14.25 कोटींची मदत

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी 'आधार' ठरत आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात आर्थिक वर्षात १७६९ रुग्णांना सुमारे १४ कोटी २५ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक साहाय्य मिळत आहे.

२० गंभीर आजारासाठी मदत कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसाहाय्य दिले जाते.

सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

आर्थिक वर्षातील मदत– १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १७६९ रुग्णांना सुमारे १४ कोटी २५ लाख ०२ हजार ५०० रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून सुरू करण्यात आलेल्या जिल्हा कक्ष, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, सामंजस्य करार आदीमुळे रूग्णांना वेळेत अर्थसाहाय्य होत आहे. गरजू रूग्णांनी योजनेचा लाभ घेण्याकरिता आणि अधिक माहितीकरिता १८०० १२३ २२११ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

## जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ.भारतकुमार सोळंके यांच्या हस्ते मानवजिगरा सोन्नर यांचा सत्कार ; ९९ वेळेस रक्तदान

**बीड । प्रतिनिधी**



येथील मानवजिगरा सोन्नर यांनी आजपर्यंत ९९ वेळेस रक्तदान करुन रुग्णांना रक्ताची मदत केल्यामुळे त्यांचे कौतुक करत जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ.भारतकुमार सोळंके यांनी सोन्नर यांचे कौतुक करत राज्य रक्त संक्रमण परिषदेकडून स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्रक व गुलाबाचे झाड देवून सन्मानित केले. यावेळी सत्काराला प्रतिउत्तर देतांना मानवजिगरा सोन्नर यांनी म्हटले की, मी यापुर्वी दि.०३ ऑगस्ट २०२१ रोजी मी मरणोत्तर बॉडी ऑर्गन डोनेट करण्याचे लिखित दिले आहे. ज्यामुळे मला माणूस म्हणून समाजासाठी काही केल्याचे सुख जाणवते. खरे पाहिले तर सत्कार्यासाठी शक्तीची नव्हे मानवधर्माची आवश्यकता आहे असे सांगितले. याविषयी माहिती अशी की, शहरातील मानवजिगरा सोन्नर हे गेल्या अनेक वर्षांपासून स्वईच्छेने रक्तदान करत आले आहेत. कोरोनाच्या महामारीमध्ये लोक भितीपोटी घराबाहेर पडत नव्हते त्यावेळी देखील जिवाची पर्वा न करता लोकसेवेचे व्रत म्हणून मानवजिगरा सोन्नर यांनी सतत रक्तदान करीत राहीले. बालपणापासूनच समाजसेवेची, नृत्याची व अभिनयाची आवड असल्याने गणपती उत्सवात व छोट्या मोठ्या कार्यक्रमातून मानवजिगरा सोन्नर यांनी आपली आवड जोपासली विविध नृत्य स्पर्धेत ३१ मानाची पारितोषिके मिळवून नृत्यामध्ये आपले वर्चस्व असल्याचे सिद्ध करुन दाखवले आहे. तसेच बीड फेस्टीव्हलच्या वैयक्तिक नृत्य स्पर्धेत त्यांनी हॅट्रीक मिळविलेली आहे. राज्यात पुणे, संभाजीनगर, लातूर, उजनी, धाराशिव, बीड, कळंब येथे त्यांनी प्रथम क्रमांकाची पारितोषिके मिळविली आहेत. २००५ मध्ये मुंबई येथे पु.ल.देशपांडे महाकरंडक, मराठवाडा लावणी महोत्सव स्पर्धेत प्रथम क्रमांक तर रोटरी क्लब संभाजीनगरच्यावतीने झालेल्या कार्यक्रमात त्यांनी द्वितीय क्रमांक मिळवून त्यांनी आपल्या अभिनयाची चमक दाखवून दिली आहे. तसेच सरगम म्युझिकमल नाईट सिने अभिनेत्री वर्षा उसगावकर यांच्या ग्रुप, हार्मेनी मेकर्स, सुहाने पल अशा ऑर्केस्ट्रात आपली कला सादर केली आहे. कर्नाटक राज्यातील गुलबर्गा येथे लाईव्ह शो करुन त्यांनी रसिकांची मने जिंकली होती. तसेच मार्शल आर्टमध्ये देखील ब्लॅक बेल्ट प्राप्त झाला आहे व युट्युब चॅनलवर अशोका सोन्नर या नावने चॅनल देखील आहे. या सर्व कार्यक्रमाच्या माध्यमातून ते प्रत्येक ठिकाणी रक्तदानाचे आवाहन करत असतात.

## फिजिक्स नीट, जी, सीईटी साठी मोफत कार्यशाळा

**बीड । प्रतिनिधी**

निलज्योती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेतर्फे दहावीची परीक्षा देऊन अकरावीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नीट जी सीईटी परीक्षेतील फिजिक्स या घटक विषयावर दिनांक १० एप्रिल ते १६ एप्रिल या कालावधीत रोज सकाळी नऊ ते दहा या वेळेत मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे.

ही कार्यशाळा, उमेद स्पर्धा परीक्षा केंद्र , घुमरे हॉस्पिटलच्या वरती , कॅनॉल रोड , नगर नाका बीड येथे होणार आहे. या कार्यशाळेत नीट, जी, सीईटी या परीक्षेत फिजिक्स विषयावर पडणारे प्रश्न कसे सोडवावे याविषयी परीक्षाभिमुख मार्गदर्शन केले जाणार आहे . तसेच नीट जी सीईटी अभ्यासक्रमातील फिजिक्स विषयाचे टॉपिक अतिशय सोप्या पद्धतीने समजावून सांगितले जाणार आहेत. डॉक्टर , इंजिनियर , कृषी किंवा संशोधन क्षेत्रात करियर करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी फिजिक्स हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. म्हणूनच या विषयावर मोफत कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. नीट जी सीईटी परीक्षेत घवघवीत यश मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी ( ८७६६८६९०८२ ) या क्रमांकावर संपर्क साधून मोफत कार्यशाळेचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेचे सचिव डॉ. नंदकुमार उघाडे यांनी केले आहे.

## स्वयंपाकघरातील 'औषधी वनस्पती' प्रदर्शनाचे बीडमध्ये आयोजन

### आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांचे नागरिकांना सहभागाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनाचे औचित्य साधून आदित्य आयुर्वेद महाविद्यालय व संशोधन केंद्र, बीड यांच्या वतीने 'स्वयंपाकघरातील औषधी वनस्पतींचे प्रदर्शन' आयोजित करण्यात आले आहे. या आगळ्यावेगळ्या उपक्रमात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केले आहे. आपल्या स्वयंपाकघरात अशा अनेक वनस्पती आणि मसाले आहेत, जे केवळ अन्नाची चव वाढवत नाहीत तर उत्तम औषधी म्हणूनही काम करतात. या प्रदर्शनात अशा जवळपास १०० हून अधिक वनस्पतींची माहिती, त्यांचे महत्त्व आणि वापरण्याची योग्य पद्धत प्रत्यक्ष दाखवली जाणार आहे.

प्रदर्शनाची वैशिष्ट्ये: या प्रदर्शनात प्रामुख्याने खालील घरगुती औषधांच्या फायद्यांविषयी मार्गदर्शन केले जाईल: मिरे: सर्दी–खोकला आणि घशातील खवखव कमी करण्यासाठी उपयुक्त.

हळद: रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आणि जखम भरून काढण्यासाठी (–पींळलरलींशीळरश्र गुणधर्म).

सुंठ: सांधेदुखी कमी करण्यासाठी आणि रक्ताभिसरण सुधारण्यासाठी. इलायची: पचन सुधारण्यासाठी आणि रक्तदाब संतुलित ठेवण्यासाठी. व १०० हून अधिक वनस्पतींची माहिती साठी स्टॉल असतील.

घरगुती वनस्पतींचा वापर करा, आयुष्य आपले सुंदर करा. असा संदेश देत डॉ. कुलकर्णी यांनी नमूद केले सुवर्णसंधीचा लाभ सर्व नागरिकांनी घ्यावा आणि आपल्या आरोग्याप्रती जागरूक व्हावे. सदर प्रदर्शन शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६ रोजी सायं. ४ ते ७ या वेळेत राष्ट्रीय कन्या शाळा, सारडा पार्क, लेन नं. ३, एम.आय.डी.सी. एरिया, बीड येथे आयोजित करण्यात आले आहे. या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आदित्य आयुर्वेद महाविद्यालय चे प्राचार्य डॉ. विवेक कुलकर्णी यांनी केले आहे.

## महाराजस्व अभियानात नागरिकांनी विविध योजनाचा लाभ घ्यावा-जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी.

### सातबारा विलगीकरण करून 68 सातबारा प्रमाणपत्र वितरण

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**



जिल्ह्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अंतर्गत शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचे वितरण शिबिराच्या माध्यमातून केले जात आहे . नागरिकांनी या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी यांनी केले. कांचनवाडी महसूल मंडळाच्या अंतर्गत तिसगाव येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, छत्रपती संभाजी नगरचे तालुक्याचे अपर तहसीलदार उमेश पाटील, तिसगावच्या सरपंच श्रीमती शकुंतला कस्तुरे तसेच विविध योजनांच्या पात्र लाभार्थ्यांची उपस्थिती होती. महसूल विभागाअंतर्गत मंडळ स्तरावर महाराजस्व शिबिर आयोजित केले जात आहे. यामध्ये शेतकऱ्यांना सातबारा उतारा ,आधार कार्ड दुरुस्ती, प्रलंबित फेरफार निकाली काढण्याबरोबरच वाद नसलेल्या फेरफार नोंदणी, रहिवाशी ,उत्पन्न प्रमाणपत्र, अकर्षक प्रमाणपत्र, जमीन अधिकृत झाल्याचे प्रमाणपत्र, एकत्रित झालेला सातबारा विलगीकरण करून स्वतंत्र सातबारा नोंद,शेतीची मोजणी, घरकुल या संदर्भात असणाऱ्या विविध प्रमाणपत्राचे वितरण केले जात आहे.

## फक्त पोलीस बनून थांबू नको पुढील परीक्षा देऊन परिवाराचे नाव आणि समाजाचे नाव मोठे कर : आम्रपाली साबळे (अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार निर्मूलन समिती मराठवाडा उपाध्यक्ष )

**बीड । प्रतिनिधी**



पुणे पोलीस भरती मध्ये बीडच्या शेख रुक्सार या युवतीने पहिल्याच प्रयत्नामध्ये यश संपादन केले. बीडचे सामाजिक कार्यकर्ते शेख युनूस यांची ती कन्या आहे. घरामध्ये नेहमीच चळवळीचे आणि आंदोलनाचे वातावरण त्यामुळे प्रत्येक सामाजिक कार्यकर्त्यांच्या घरांमध्ये फार वेगळे वातावरण आपणास पहावयास मिळते. परंतु जिद्दीवर आणि शिक्षणावर वचक मिळवून या युवतीने पोलीस भरतीमध्ये अगदी पहिल्याच प्रयत्नात बाजी मारली आणि घरातील कोणीही सरकारी कर्मचारी नसतानाही पहिली सरकारी नोकरी मिळवली. सामाजिक कार्यकर्त्या तथा अन्याय अत्याचार भ्रष्टाचार विरोधी समितीच्या मराठवाडा उपाध्यक्ष आम्रपाली साबळे आणि महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या जिल्हाध्यक्ष मोनिका बेद्रे यांनी तिचे हिंदू कोड बिल १९५० हे पुस्तक देऊन कौतुक करून आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी भाषणामध्ये बोलताना त्यांनी तिला प्रेरणा देत म्हटले की तू मुलगी आहेस या बंधनात न थांबता पुढे प्रशासनातील आणखीन मोठ्या पदव्या मिळून अजून याच्याही पेक्षा मोठे यश संपादन कर आणि भारताची सेवा कर व बीडचे नाव लौकिक कर आणि परिवाराचे नाव लौकिक कर. कार्यक्रम लिंबागणेश चे सामाजिक कार्यकर्ते चळवळीमध्ये नेहमी सक्रिय असणारे डॉक्टर गणेश ढवळे, बाळासाहेब मोरे यांनी केले या कार्यक्रमासाठी अनेक विविध संघटनाचे पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ऑलिम्पियाडमध्ये शौर्य डोंगरेला गोल्ड मेडल



**बीड । प्रतिनिधी**

शहरातील तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये यूकेजी वर्गात शिकणारा शौर्य सुनील डोंगरे याने राष्ट्रीय–आंतरराष्ट्रीय स्तरावरील ऑलिम्पियाड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत सुवर्णपदक पटकावले आहे. लहान वयातच मिळवलेले हे यश शाळेसह जिल्ह्यात अभिमानास्पद ठरले आहे. शौर्यच्या या यशामागे त्याची जिद्द, अभ्यासू वृत्ती आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. तुलसी शैक्षणिक समूहाचे संचालक प्रा. प्रदीप रोडे, प्राचार्या उमा जगतकर तसेच वर्ग शिक्षिका फातिमा शहा यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कलागुणांना प्रोत्साहन देत त्यांच्याकडे विशेष लक्ष दिल्यानेच शौर्यने उज्ज्वल यश मिळविले आहे.

विशेष म्हणजे, शौर्य डोंगरे याने यापूर्वीही राज्यस्तरीय लिटल चॅम्प ऑन रॅम स्पर्धेत उल्लेखनिय कामगिरी करत पारितोषिक मिळवले होते. त्यामुळे त्याच्या सातत्यपूर्ण यशाची परंपरा कायम राहिली आहे. शौर्यच्या या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन, शिक्षकवर्ग व पालकांकडून त्याचे कौतुक होत असून, भविष्यातही तो असेच यश संपादन करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान माझा मुलगा शौर्य सुनील डोंगरे याने इतक्या लहान वयात ऑलिम्पियाड परीक्षेत सुवर्णपदक मिळवून आमचं स्वप्न साकार केलं आहे. त्याच्या या यशाचा आम्हाला खूप अभिमान वाटतो. शौर्यने नेहमीच अभ्यासाबरोबर जिज्ञासा आणि सातत्य ठेवले, त्यामुळेच त्याला हे यश मिळाले आहे.

## लोहीग्राममध्ये समाधान शिबिरातून 384 लाभार्थ्यांच्या स्वप्नांना मिळाली उभारी

### कृषी योजनेअंतर्गत रमाकांत काळे यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप ; प्रशासनाच्या गतिमान कामाचे कौतुक

**परभणी । प्रतिनिधी**



शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी लोहीग्राम येथे शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सोनपेठचे तहसीलदार सुनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत शेळगाव मंडळातील एकूण ३८४ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आला. लोहीग्राम येथील समाधान शिबिरामध्ये ग्रामस्थांना जागेवरच सेवा व प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले.

समाधान शिबिरात लोहीग्राम सरपंच अस्मिता अनंतराव हिक्के, कान्हेगाव सरपंच माणिक कोरडे, नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल, मंडळ अधिकारी ज्योती प्रधान, उप कृषी अधिकारी मोतीराम भंडारे, पशुसंवर्धन अधिकारी एस.एम. डाके, भूमी अभिलेख विभागाचे महेश काकडे, ग्राम महसूल अधिकारी अमोल स्वामी,बालाजी नागदे, बाबाराव हरकळ, संघप्पा देशमुख, शाहुराज दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती.

या शिबिरात नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी स्वतः लाभार्थ्यांशी संवाद साधला आणि पात्र नागरिकांना शिधापत्रिका, संजय गांधी निराधार योजना, सातबारा नोंदी, नमुना ८–अ, फेरफार नोंदी, डिजिटल सातबारा, प्रमाणपत्रे, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख विभागाच्या योजनांचे तात्काळ वाटप केले. प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणून सामान्य नागरिकांचे प्रश्न त्यांच्या दारी जाऊन सोडवणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी यावेळी केले.

अधिकारी स्वतः आमच्या गावात आले, यामुळे आमचा वेळ आणि पैसा वाचला, अशी कृतज्ञ भावना लाभार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रशासनाच्या या गतिमान कामामुळे प्रलंबित कामे निकाली निघाल्याने शेळगाव महसूल मंडळ परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

एकूणच प्रशासन आपल्या दारी हा उद्देश या शिबिरामुळे यशस्वी ठरला आहे. यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मंडळ अधिकारी पंकज पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला शेतकरी, विद्यार्थी, ग्रामस्थ आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुकाराम येवले यांची माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या BLA१ विधानसभा प्रमुखपदी निवड



**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील शिवसेना पक्षाचे तालुकाप्रमुख तुकाराम येवले यांची माजलगाव विधानसभा मतदारसंघाच्या इङ–१ विधानसभा प्रमुखपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीमुळे तालुक्यासह संपूर्ण मतदारसंघात समाधान व्यक्त होत असून विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. ही निवड महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख मा. ना. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे , शिवसेना सचिव संजय मोरे , मराठवाडा संपर्कप्रमुख ना. प्रकाश आबिटकर, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, तसेच बीड जिल्हा संपर्कप्रमुख मनोज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आहे. यासोबतच शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनीही या निवडीस मान्यता देत येवले यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. दरम्यान, या निवडीबद्दल कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून शिवसेना उपजिल्हाप्रमुख नितीन मुंदडा धारूर शिवसेना तालुकाप्रमुख बाळासाहेब कुंरूद, वडवणी तालुकाप्रमुख माऊली गोंडे शिवसेना माजलगाव शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेना तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड , शिवसेना वैद्यकीय मदत पक्षाच्या तालुका समन्वयक वर्षाताई आगे, उपतालुकाप्रमुख नारायण चांदबोधले माऊली कदम महादेव सुरवसे सुशील हांडे अनिल आवाड विलास नेमाने अशोक ढोणे जय सुतार यांच्यासह अनेकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● शनिवार दि. ११ एप्रिल २०२६ ●

## थोडक्यात...

### मौजे पिंपळनेर येथील बालू वरपे याच्या घरी मा.जिल्हा प्रमुख सातपुते यांनी दिली भेट



**पिंपळनेर । प्रतिनिधी**

राहत्या घरी परवा मध्यरात्री चोरीची घटना घडली. या घटनेत चोरट्यांनी वरपे कुटुंबीयांचे सुमारे दीड लाख रुपये रोख रक्कम तसेच अंदाजे सात आठ लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने लंपास केले आहेत. ही घटना समजताच आज शिवसेना माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी पिंपळनेर येथे जाऊन वरपे कुटुंबीयांची भेट घेतली व संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती जाणून घेतली. गावामध्ये वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस प्रशासनाने गस्त वाढवून अशा घटनांवर आळा घालावा. यावेळी सोबत बीड प्रहारचे संपादक अशोक नाना होळकर, युवानेते उमेशजी आनेराव, कचरू भाऊ पेंढारे, सनराईज इंग्लिश स्कूलचे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर सातपुते सर, पांडुरंगजी चाळक, आकाशजी जोगदंड, उमेश वरपे, लिंबाजी वरपे, राजेंद्र सातपुते, अमोल ढेपाळे, दत्ता पवार सह इतर सहकारी व गावकरी उपस्थित होते.

### बोधेगाव येथील सर्व समाज बांधवांच्या वतीने पोलीस बांधव सम्मानित



**तलवाडा । प्रतिनिधी**

मेजर परशुराम पाचपुते हिंगोली पोलीस, विशाल भोंगळे पालघर पोलीस, ज्ञानेश्वर मडके पुणे पोलीस यांची पोलीस दलात भरती झाल्या बद्दल बोधेगाव येथे मुस्लीम बांधवांच्या वतीने इदगाह मस्जिद बोधेगाव या ठिकाणी सर्व समाज बांधवांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात येऊन यथोचित सम्मानित करुन पुढील वाटचालीसाठी उपस्थित सर्व समाज बांधवांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या.

### भारताचा पाया माझा भीमराया : प्रा.जगदिश ओहोळ




**बीड । प्रतिनिधी**

ज्या वस्तीत कधी दिवा लागत नव्हता, सावलीचाही विटाळ मानला जात होता, जिथे माणूस असूनही माणसाला माणसासारखे जगू दिले जात नव्हते–अशा अंधकारमय परिस्थितीत प्रज्ञासूर्याचा जन्म झाला. त्या महान व्यक्तिमत्त्वाने समता, स्वातंत्र्य आणि बंधुतेची बीजे रोवून समाजाला नवा प्रकाश दिला. त्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या देशाचा भक्कम पाया आहेत, असे प्रभावी प्रतिपादन 'जग बदलणारा बाप माणूस' या पुस्तकाचे लेखक प्रा. जगदिश ओहोळ यांनी केले. बीड शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त गुरुवारी (दि. ९) आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. त्यांच्या ओजस्वी आणि विचारप्रवर्तक भाषणाने उपस्थितांमध्ये सामाजिक जाणीव आणि प्रेरणेची नवी चेतना निर्माण झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाज कल्याण विभागाचे उपयुक्त उमेश सोनवणे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक संचालक दत्तात्रय क्षीरसागर, उपयुक्त (कौशल्य विभाग) समाधान किरवले, गोविंद कदम, अंकुश निर्मळ, अमरसिंह ढाका यांची उपस्थिती लाभली. आपल्या भाषणात प्रा. ओहोळ यांनी डॉ. आंबेडकरांच्या कार्याचा जागतिक प्रभाव अधोरेखित करताना सांगितले की, जगाच्या ज्ञानवेशीवर मानल्या जाणाऱ्या कोलंबिया विद्यापीठात त्यांचा पुतळा उभारलेला आहे, ही त्यांच्या विचारांची जागतिक दखल असल्याची साक्ष आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नितीन वाघमारे यांनी केले. सूत्रसंचालन प्रसिद्ध निवेदक महादेव इनकर, प्रा.संजय सावते यांनी केले. तर आभार प्रणित सरवदे यांनी मानले. ही व्याख्यानमाला केवळ कार्यक्रम न राहता, सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा देणारा विचारांचा जागर ठरला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहर यांनी मोलाचे

# जाज्वल्य दैवत त्वरिता देवीच्या यात्रेस प्रारंभ तब्बल महिनाभर चालते यात्रा

**तलवाडा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यात महाराष्ट्रातील अनगिनत भाविक भक्तांचे श्रद्धास्थान म्हणून सर्व परिचित असणारे तलवाडा येथील जाज्वल्य शक्तीपीठ माता त्वरिता देवी, तलवाडा व तलवाडा पंचक्रोशीतील आणेक पूर्वज महाराष्ट्रासह विविध राज्यात स्थायीक झालेले आहेत. परंतु परंपरागत आपल्या गावातील अराध्य दैवत माता त्वरितादेवीच्या आगाध महिमेला विसरले नसल्याचे या यात्रा ऊत्सव काळात प्रतेक्षात दिसुन येते ह्यात आसलेले व नसलेल्या बाप जाध्यांनी देवीची महिमा आपल्या कुटुंबात रुजवल्याने कुटुंबातील सदस्य जिथे आसतील तेथुन यात्रा ऊत्सब काळात तलवाडा या आपल्या गावी येऊन त्वरिता देवीच्या आगाध महिमेचा लाभघेतात. आस्या या आगाध महिमेच्या जाज्वल्य देवीच्या यात्रेस सुरुवात झाली असून ही यात्रा तब्बल एक महिना भर चालते याकाळात बीड जिल्ह्यासह





महाराष्ट्रातुन व इतर राज्यातून देखील मोठ्या प्रमाणात भाविक भक्त प्रतीवर्ष दर्शनासाठी येतात, या ठिकाणी भाविक आपल्या अनंत आडचणीचा ऊहापोह आपल्या आराध्य दैवत माता त्वरिता देवीच्या चरणी नतमस्तक होऊन मांडतात. व आपल्या पुर्ण झालेल्या नवसाची पूर्तता करण्यासाठी सातत्याने या ऊत्सव काळात तलवाडा या ठिकाणी येतात, गेवराई पासुन जबळपास १८ किलोमीटर तलवाडा येथे उंच आस्या डोंगरमाथ्याच्या माळ रानावर जगदंबा देवी चे भव्यदिव्य मंदिर आसुन भाविक भक्तांच्या नवसाला त्वरित पावणारी आई जगदंबा त्वरीतादेवीची आगाध महिमा शबंदांच्या पलीकडची असुन शब्दात महिमेची वर्णनात्मक मांडणी करने एक पत्रकार म्हणून माझ्या सारख्या पामरला शक्य नाही. अनेक भाविक भक्तगण या ठिकाणी आल्यावर आपल्या इच्छा, अकांशा व मनोकामना देवी चरणी बोलून दाखवत नवस बोलतात आणि ते नवस आष्टमी ला पूर्ण करतात त्याच बरोबर बाहेरून येणारे भाविक यात्रा उत्सव काळात आपले नबस पूर्ण करतात, चैत्र पौर्णिमेला माता त्वरिता देवीला तेल लागते व अष्टमीला तेल उत्तरते अशी परंपरागत अख्ययिका आहे, आणि याच दिवसा पासून यात्रा उत्सवाला प्रारंभ होतो हा यात्रा उत्सब तब्बल एक महिनाभर चालतो काळात देवीच्या पायथ्याजवळ विविध प्रकारची खेळणी दुकाने मनोरंजन व्यवस्था सुरू असतात या एक महिन्या भर महाराष्ट्राच्या विविध भागातून भाविक भक्त दर्शनासाठी येतात व आपल्या नवसाची पूर्तता करुन आपल्या जाज्वल्य दैवताचे आशीर्वाद घेतात. आस्था आणी श्रद्धेच्या आगाध महिमेच्या यात्रा ऊत्सवास येणा–या तमाम भाविक भक्तांना दैनिक मराठवाडा पत्र परिवाराच्या वतीने खुप खुप मनस्वी हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

## नर्मदा तीरावरील महायोगी दादा गुरु महाराज यांची आ. सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट

**आष्टी। प्रतिनिधी**

मध्यप्रदेशातील पवित्र नर्मदा नदी तीरावर दीर्घकाळ कठोर साधना करणारे संत समर्थ दादा गुरु महाराज यांनी शुक्रवारी आष्टी विधानसभेचे आ. सुरेश धस यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. या प्रसंगी आ.सुरेश धस पत्नी सौ. प्राजक्ताताई धस, युवा नेते सागर धस यांनी त्यांचे सस्नेह व आदरपूर्वक स्वागत केले. दादा गुरु महाराज हे गेल्या पाच वर्षांहून अधिक काळ 'निराहार' राहून केवळ नर्मदा जल अथवा वायूवर साधना करत असल्याचे मानले जाते. ते नर्मदा नदी संवर्धन, पदयात्रा, वृक्षारोपण तसेच पर्यावरण जनजागृती यांसारख्या उपक्रमांमध्ये सक्रिय असून, त्यांनी आतापर्यंत चार लाख किलोमीटरहून अधिक पायी प्रवास केल्याची नोंद आहे. भेटीदरम्यान दादा गुरु महाराजांनी आ. सुरेश धस, सौ. प्राजक्ताताई धस, सागर धस व इतर कुटुंबीयांना आशीर्वाद



दिले. ज्यांनी मच्छिंद्रनाथ बाबा यांच्या समाधीचे प्रवेशद्वार केले, त्यांच्या घरात मी प्रवेश केला म्हणजे माझ्याच घरात आलो, असे भावनिक उद्गार त्यांनी व्यक्त केले. तसेच भीमा नदी, अमरजा नदी आणि गोदावरी नदी या केवळ नद्या नसून शक्तिस्थान असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी त्यांनी प्रभू रामचंद्र यांच्या वास्तव्याशी निगडित नदीपात्र कोरडे झाल्याचा उल्लेख करत, भविष्यात भीमा नदीचे पाणी या भागात येऊन सुमारे ७५ ते ८० गावांमध्ये हरित क्रांती घडेल, असा विश्वास व्यक्त केला. त्यांच्या या अमोघ वाणीतून समाजहित, पर्यावरण संवर्धन आणि धार्मिक मूल्यांच्या जपणुकीचा संदेश देण्यात आला. या सदिच्छा भेटीमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले. यावेळी प्रमुख पदाधिकारी, व्यापारी, भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थितांमध्ये उत्सुकता आणि समाधानाचे वातावरण पाहायला मिळाले.

### समकालीन आव्हाने आणि गांधीवादी विचार या विषयावर व्याख्यानमाला संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभाग आणि गांधी अध्यासन केंद्र अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने समकालीन जागतिक आव्हाने आणि गांधीवादी विचार या विषयावर ऑनलाईन व्याख्यानमाला दिनांक ४,६ व ९ एप्रिल २०२६ दरम्यान संपन्न झाली. या व्याख्यानमालेचे पहिले पुष्प जागतिक राजकारणातील बदलणारे प्रवाह: एक समकालीन विश्लेषण या विषयावर प्रा. प्रदीप जानकर (डी.जी.रूपारेल महाविद्यालय, मुंबई), दुसरे व्याख्यान समकालीन आव्हाने आणि गांधी विचार या विषयावर यशवंत सोनूने (मराठी विभाग प्रमुख जे. इ. एस. महाविद्यालय, जालना तर तिसऱ्या व्याख्यानात बदलते जागतिक संदर्भ आणि गांधी विचारांची प्रासंगिकता या विषयावर माधव शिंदे अर्थशास्त्र विभाग अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर यांनी मार्गदर्शन केले.

## बीड शहरातील नागसेन बुद्ध विहारात १३ एप्रिल रोजी होणाऱ्या बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास उपस्थित रहावे: पप्पू कागदे

**बीड । प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९५६ साली धर्मांतराची घोषणा केली होती. मी हिंदू म्हणून जन्माला आलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही, ही घोषणा करून १४ ऑक्टोबर १९५६ साली नागपूर मुक्कामी तथागतांच्या बुद्ध धम्माची दीक्षा घेऊन सारा भारत बौद्ध धम्ममय करण्याचा संकल्प केला होता. तथागतांच्या बुद्ध धम्माचा प्रसार व प्रचार करण्यासाठी सोमवार दि.१३ एप्रिल रोजी सकाळी, १० वाजता नागसेन बुद्ध विहार पालवण चौक, बीड या ठिकाणी तथागतांच्या बुद्ध मूर्तीची प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास पुज्य भिक्खु डॉ. इंदवंस्स महाथेरो (छ. संभाजीनगर),ज्या भिक्खु धम्मशील थेरो (महाविहार धम्मभूमी शिवणी),पूज्य भिक्खु अश्वजित (छ. संभाजीनगर), पुज्य भिक्खु पंय्यावर्धन (हिंगोली), पुज्य भिक्खु सुमेधबोधी (छ.



संभाजीनगर) पुज्य भद्रेय (छ संभाजीनगर) आदी उपस्थित राहणार आहेत. सोमवार दि.१३ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ठिक १० वाजता नागसेन बुद्ध विहार पालवण चौक बीड येथे आयोजित बुद्ध मूर्ती प्रतिष्ठापणा व अनावरण सोहळ्यास बीड शहरातील सर्व उपासक-उपासिका यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड शहराचे सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

# काकांच्या वाढदिवसानिमित्त पुतण्याचा माणुसकी जागर

**माजी आ. केशवदादा आंधळे अभिष्टचिंतन दिन, अँड. मयुरभैय्या आंधळे यांनी दिला आर्थिक मदतीचा हात !**

**वडवणी । प्रतिनिधी**

राजकारणात काका विरुद्ध पुतण्याचा संघर्ष पहावयास मिळाला होता. परंतु वडवणी येथील आंधळे कुटुंबियातील काका माजी आ. केशवदादा आंधळे हे पुतण्यांसाठी एक मार्गदर्शक जेष्ठ व्यक्तिमत्व आहेत. त्यांच्याच वाढदिवसानिमित्त कोणताच गाजावाजा न करता पुतणे रुई गावचे आदर्श सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी माणुसकीचा जागर प्रत्यक्ष अंगी बाळगून गावातील अपघातग्रस्त कुटुंबीयांना आर्थिक मदतीचा हात देत आमदार काकांना दीर्घ आयुष्य लाभावे अशी प्रार्थना केली या उपक्रमाचे वडवणी पंचक्रोशीत कौतुक होत आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, चौसाळा मतदार संघाचे माजी आमदार तथा ऊसतोड कामगारांचे नेते केशवदादा



आंधळे यांचा वाढदिवस ६ एप्रिल रोजी अगदी साधेपणाने आणि उत्साहात हितचिंतकांनी साजरा केला. या वाढदिवसाचे औचित्य साधून पुतणे रुई गावचे आदर्श उच्चभूषित सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी काकांचा वाढदिवस आगळा-वेगळ्या पद्धतीने साजरा करण्याचा मानस ठेवला. 'पैशाची उधळपट्टी नको' वाढदिवसाचा पैसा हा गरजवंतांच्या मदतीला देण्याचा मानस ठेवला आणि काका माजी आमदार केशवदादा आंधळे यांच्या वाढदिवसानिमित्तचे औचित्य साधून मागील मार्च महिन्यामध्ये रुई (पिंपळा) या गावातील अप्पर कुंडलिका मध्यम प्रकल्पचच्या काठावर मोटर चालू करण्यासाठी गेलेल्या गावातील तरुण स्व. पांडुरंग जालिंदर लोंढे या २८ वर्षीय तरुणचा पाय घसरून पडल्याने पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाला होता. त्या अनुषंगाने सदरील कुटुंबासाठी काही तरी करूयात हा मनाचा संकल्प होता. त्या अनुषंगाने गावचे आदर्श सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी या कुटुंबाला आर्थिक मदतीचा हात देऊन माणुसकीचा जागर निभवला. ही मदत कुटुंबीयांसाठी 'फुल नाही फुलाची पाकळी' बनत कामी आली. तर या कुटुंबीयांसाठी मंत्रालयातून मदत मिळवण्यासाठी कार्यतत्पर राहून मदत मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सुद्धा सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी ग्वाही दिली असून माणुसकीचा आर्थिक हात पुढे करत काकांना दीर्घ आयुष्य लाभावे. अशी प्रार्थना करत माजी आमदार केशवदादा आंधळे यांचा अभिष्टचिंतन दिन अगदी साधेपणाने साजरा करत पुतणे अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी समाजा समोर आदर्श ठेवला आहे. या सामाजिक उपक्रमाचे सर्वस्तरातून कौतुक होत आहे. यावेळी समवेत ग्रामपंचायत चे विद्यमान उपसरपंच मा. श्री. सुधाकर आप्पा लोंढे पाटील, ग्रामपंचायत सदस्य मा. श्री. कृष्णा नाना खाडे, ग्रा.प. सदस्य मा. श्री. अशोक विष्णू लोंढे, ग्रा.प. सदस्य ना. श्री. बाबासाहेब धर्मराज आंधळे, ग्रा. प. सदस्य मा. श्री. अशोक महादेव लोंढे, सेवा सोसायटी सचिव मा. श्री. बालासाहेब सोपान आंधळे, ज्येष्ठ व्यापारी मा. श्री. गोरख तात्या आंधळे, मा. श्री. कृष्णा आंधळे पाटील, मा. श्री. भागवत लोंढे, श्री. उमेश आंधळे, श्री. कृष्णा महादेव आंधळे, लोकपत्रकार श्री. बाप्पासाहेब भांगे हे उपस्थित होते.

**● मयूरभैय्या आंधळे आशावादी पोरं**

**वडवणी तालुक्याच्या नव्हे तर जिल्ह्याच्या स्थानिक ग्रामपंचायतीच्या आखाड्यात अँड. मयूरभैय्या आंधळे यांनी रुई पिंपळा गावच्या माध्यमातून नाव कोरले आहे. उच्चभूषित शैक्षणिक पदवीसह उच्च विचारसरणी ठेवून 'रंजल्या गांजल्यांची सेवा' हाच माणुसकीचा जागर संकल्पना राबवून मदतीचा हात पुढे करण्यातही अग्रेसर आहेत. त्यांनी आतापर्यंत गावातील तीन घटनांतील मयत व्यक्तींच्या कुटुंबीयांना थेट मंत्रालयात पाठपुरावा करून आर्थिक मदत मिळवून दिली आहे. गावच्या विकासा सोबत हेही पुण्याच काम तेवढ्याच तन मन आणि धनाने देखील केले असल्याने रुई गावचे आदर्श व उच्चभूषित युवा सरपंच अँड. मयूरभैय्या आंधळे या भागात एक आशावादी पोर म्हणून ओळख निर्माण झाली आहे.**